**ठळक बातम्या**

- अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसान भरपाईची रक्कम लवकरच जाईल, असं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन /पुण्यात कोरेगाव पार्क जमीन प्रकरणी चौकशीचे आदेश दिल्याचं प्रतिपादन

- वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाचं उद्या दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन

- बिहार विधानसभा निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यात ६० टक्के मतदान

**आणि**

- चौथ्या टी-ट्वेंटी क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियावर ४८ धावांनी विजय मिळवत भारताची मालिकेत २-१ अशी आघाडी

**<><><><>**

राज्यातल्या काही अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांपर्यंत अद्यापही नुकसान भरपाईची मदत पोहोचली नसल्यानं संभ्रम निर्माण झाला आहे, मात्र ही मदत लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं. ते आज नागपुरात बातमीदारांशी बोलत होते. ते म्हणाले….

**बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस (२४ सेकंद)**

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे मराठवाडा दौरा, निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन करत असल्याची टीका फडनवीस यांनी केली.

पुण्यात कोरेगाव पार्क इथल्या कथित जमीन गैरव्यवहारप्रकरणी महसूल विभाग, आयजीआर, जमीन नोंदणी दस्तऐवजाची माहिती मागवली असून चौकशीचे आदेश दिल्याचं त्यांनी वार्ताहरांना सांगितलं. प्रथमदर्शनी जे मुद्दे समोर आहेत ते गंभीर आहेत, ही माहिती आणि प्राथमिक चौकशीच्या आधारे पुढचा निर्णय घेतला

जाईल, असं मुख्यमंत्री म्हणाले. पार्थ पवार यांच्या अमीडीया होल्डिंग्ज एलएलपी या कंपनीनं अठराशे कोटी रुपये किमतीची जमीन केवळ तीनशे कोटी रुपयात सरकारी जमीन कशी खरेदी केली असा प्रश्न विचारत, या व्यवहारात घोटाळा झाल्याचा आरोप काँग्रेस विधिमंडळ पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

**या प्रकरणाची** आपल्याकडे काहीही माहिती नाही, याच्याशी आपला संबंध नाही अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वार्ताहरांशी बोलताना दिली. असा काहीतरी प्रकार सुरू असल्याचं आपण तीन चार महिन्यांपूर्वी ऐकलं होतं, त्यावेळी कुठलीही चुकीची गोष्ट केलेली आपल्याला चालणार नाही असं आपण सांगितलं होतं, असं पवार म्हणाले. आपण आजपर्यंत कुठल्याही नातेवाईकाला फायदा करून देण्यासाठी कधीही कोणत्या अधिकाऱ्यावर दबाव आणला नाही, आपलं नाव घेऊन कुणी असं करण्याचा प्रयत्न केला तर त्याला आपला पाठिंबा नाही हे अधिकाऱ्यांनी लक्षात घ्यावं असं पवार यांनी स्पष्ट केलं. या प्रकरणाची पूर्ण माहिती घेऊन उद्या माध्यमांसमोर वस्तुस्थिती ठेवू असं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाचं उद्घाटन उद्या दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीनं याचं आयोजन करण्यात येणार असून, स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा देणारं हे गीत बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी दीडशे वर्षांपूर्वी लिहीलं होतं. देशभरात या निमित्त वर्षभर विविध कार्यक्रम होणार आहेत. उद्याच्या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते विशेष टपाल तिकीट आणि नाण्याचं प्रकाशन होणार आहे.

या निमित्त संशोधक आणि संगीत संग्राहक मिलिंद सबनीस यांची विशेष मुलाखत उद्या रात्री ८ वाजता दिल्लीवरुन प्रसारित होणार आहे. मुंबईसह राज्यातली सर्व केंद्र ही मुलाखत सहक्षेपित करतील. त्यामुळे रात्री ८ वाजून ५

मिनिटांनी प्रसारित होणारं मराठी राष्ट्रीय बातमीपत्र उद्या ८ वाजून ३० मिनिटांनी प्रसारित होईल.

<><><><>

जीएसटी म्हणजेच वस्तू आणि सेवा करातल्या सुधारणांना करदात्यांकडून प्रथमपासूनच भरघोस प्रतिसाद मिळत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. भारतीय स्टेट बँकेतर्फे मुंबईत आयोजित १२व्या बँकिंग आणि अर्थविषयक परिषदेत आज त्या बोलत होत्या. आर्थिक समावेशनात बँकांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे असं त्या म्हणाल्या. उत्पादकता आधारित सवलत योजने मुळे गेल्या मार्च महिन्यात देशाची निर्यात ६१ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त झाली असून १२ लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती झाली आहे, अशी माहिती त्यांनी दिली. "विखंडित जागतिक स्थितीत भारताची आत्मनिर्भरतेकडे ओढ" ही परिषदेची संकल्पना आहे.

<><><><>

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज धाराशिव जिल्ह्यात शेतकऱ्यांशी संवाद साधला. मराठवाड्यात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे, जमीन खरडून गेली आहे, रस्ते वाहून गेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत मिळायला हवी असं ठाकरे म्हणाले. शेतकऱ्यांची कर्जमाफी करू असं आश्वासन देऊन महायुती सत्तेवर आली, मात्र दिलेलं आश्वासन पाळलं नाही, अशी टीका ठाकरे यांनी यावेळी केली.

**होल्ड बाईट ठाकरे (१६ सेकंद)**

<><><><>

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या कालावधीत आचारसंहितेत सूट देण्यासाठी प्राप्त प्रस्तावांच्या छाननीसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत. राज्य निवडणूक

आयुक्त दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली गेल्या महिन्यात झालेल्या बैठकीत या समितीची गरज व्यक्त करण्यात आली होती. त्यानुसार वाघमारे यांनी हे निर्देश दिले आहेत.

<><><>

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यातलं मतदान आज शांततेत पार पडलं. संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ६० टक्के मतदान झाल्याचं वृत्त आहे. १८ जिल्ह्यात मिळून १२१ मतदारसंघांमधे १ हजार ३१४ उमेदवारांचं भवितव्य मतदान यंत्रात बंद झालं. बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्यासह राज्यमंत्रिमंडळाच्या १६ सदस्यांचा तसंच राजद नेता तेजस्वी यादव यांचा त्यात समावेश आहे.

दरम्यान दुसऱ्या टप्प्यातला प्रचार आता जोमाने सुरु झाला असून भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि अमित शहा वेगवेगळ्या ठिकाणी प्रचारसभा होत आहेत.

दुसऱ्या टप्प्यात १२२ मतदारसंघांमधे येत्या ११ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. मतमोजणी १४ नोव्हेंबरला होईल.

<><><>

टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेत आज ऑस्ट्रेलियात कॅररा इथं झालेल्या चौथ्या सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियावर ४८ धावांनी विजय मिळवला. ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केलं. भारतानं निर्धारित २० षटकात ८ गडी गमावून १६७ धावा केल्या. शुभमन गिलनं सर्वाधिक ४६ धावा केल्या. अक्षर पटेलनं ११ चेंडूत नाबाद २१ धावा करत मोलाचं योगदान दिलं.

या धावसंख्येचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संघ १८ षटकं आणि २ चेंडूत ११९ धावात गारद झाला. भारतातर्फे वॉशिंग्टन सुंदरनं ३ तर अक्षर पटेल

आणि शिवम दुबेनं प्रत्येकी २ गडी बाद केले. अक्षर पटेल सामन्यातला सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला.

पाच सामन्यांच्या या मालिकेत भारतानं २-१ अशी आघाडी घेतली आहे.

<><><>

आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक - २०२५ च्या विजेत्या भारतीय महिला संघानं इतिहास रचला असून या सर्व महिला तरुण पिढीसाठी आदर्श आहेत, अशा शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संघातल्या महिला खेळाडूंचं कौतुक केलं आहे. विजेत्या महिला संघानं राष्ट्रपती भवनात राष्ट्रपतींची भेट घेतली, त्यानंतर मुर्मू यांनी समाज माध्यमांवर म्हटलंय, की वेगवेगळ्या प्रदेशातून आलेल्या या खेळाडूंची पार्श्वभूमी, परिस्थिती भिन्न असली तरी त्यांनी एकत्रितपणे देशाचं प्रतिनिधित्व केलं असून, हा संघ म्हणजे देशाचं प्रतिबिंब आहे.

विश्वचषक विजेत्या संघातल्या खेळाडूंनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचीही त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. या खेळाडूंनी ‘फिट इंडियाचा’ संदेश सर्वत्र पोहोचवावा, तसंच तंदुरुस्त राहण्यासाठी तरुणांना प्रोत्साहित करावं, असं आवाहन प्रधानमंत्र्यांनी केलं.

<><><>

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान उद्या संभाजीनगर जिल्हा आणि परिसरातल्या ग्रामीण भागाचा दौरा करणार आहे. कृषीमंत्र्यांचा हा एकदिवसीय दौरा असून ते यावेळी स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थांशी संवाद साधतील, पूरग्रस्त भागाचा तसंच कृषी आणि ग्रामीण विकास योजनांच्या अंलबजावणीचा आढावा घेतील, असं कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं सांगितलं आहे.

<><><>

नेरळ-माथेरान दरम्यान धावणारी प्रसिद्ध ‘टॉय ट्रेन’ आजपासून  पुन्हा सुरू झाली आहे. जून महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या अतिवृष्टीमुळे ही ट्रेन बंद करण्यात आली होती.  रोज सकाळी ८ वाजून ५० मिनिटांनी आणि १० वाजून २५ मिनिटांनी ही ट्रेन नेरळहून निघेल तर माथेरानहून रोज दुपारी २ वाजून ४५ मिनिटांनी आणि संध्याकाळी चार वाजता नेरळकरता रवाना होईल. सहा डब्यांच्या या ट्रेन मध्ये तीन डबे द्वितीय श्रेणीचे तर ,दोन साधारण श्रेणीचे डबे असतील. पहिल्या ट्रेनमध्ये विस्टाडोम कोच असेल, तर दुसऱ्या ट्रेनमध्ये फर्स्ट क्लास कोच असणार आहे. १९०७ मध्ये सुरू झालेली नेरळ– माथेरान लाइट रेल्वे यंदा  ११८ वं  वर्ष साजरं  करत आहे.

<><><><>

भारतीय नौदलाच्या जलक्षेत्र सर्वेक्षणाची क्षमता वृद्धिंगत करणारं इक्षक टेहेळणी जहाज आज औपचारिकरित्या नौदलाच्या सेवेत दाखल झालं. नौदल प्रमुख अँडमिरल दिनेश त्रिपाठी यांच्या उपस्थितीत समारंभपूर्वक दक्षिण आरमाराच्या ताफ्यात हे जहाज तैनात झालं. त्याचा बहुतांश भाग देशांतर्गत उत्पादन सामुग्रीतून तयार झाला आहे. जहाजं, बंदरं, जलमार्ग, किनारपट्टी आणि खोल समुद्रातल्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी या  जहाजाची निर्मिती केली आहे.

<><><><>

नवी मुंबईतल्या ऐरोली इथं आज दुपारी आग लागली. यात काही झोपड्या जळून खाक झाल्या तसंच तीन गोदामं जळाली आहेत.  आगीची माहिती मिळताच अग्निशमन विभागाच्या जवानांनी घटनास्थळी पोहोचत आग आटोक्यात आणली. आगीचं कारण अद्याप समजू शकलं नाही.

<><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज १४८ अंकांची घसरण झाली आणि तो ८३ हजार ३११ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ८८ अंकांची घसरण नोंदवत २५ हजार ५१० अंकांवर बंद झाला.

<><><><>

गेल्या चोवीस तासात कोकणात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानात वाढ झाली.

येत्या दोन दिवसात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात इतरत्र हवामान कोरडं राहिल.

//<><><><>//